॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव, दि. २२ जुलै : विद्यार्थी हिताला सर्वोच्च प्राधान्य देत कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या आज झालेल्या बैठकीत शैक्षणिक वर्ष २०२६–२७ पासून विविध विद्यार्थी कल्याणकारी योजनांच्या अनुदानात लक्षणीय वाढ करण्याचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे आर्थिकदृष्ट्या गरजू विद्यार्थ्यांना दिलासा मिळण्याबरोबरच विद्यार्थी विकास, कौशल्यविकास आणि उद्योजकतेला मोठी चालना मिळणार आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या प्रशिक्षणासाठी आर्टीफिशल इंटेलिजन्स (एआय) प्रयोगशाळा उभारणीसाठी ४४ लाख रूपयांचा अंदाजित खर्चास मंजूरी देण्यात आली.

विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली व्यवस्थापन परिषदेच्या सदस्यांची बैठक संपन्न झाली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. एस. टी. इंगळे, व्यवस्थापन परिषद सदस्य राजेंद्र नन्नवरे, प्राचार्य एस. आर. राजपूत, प्राचार्य संजय सुराणा, प्रा. शिवाजी पाटील, प्रा. सुरेखा पालवे, ॲड. अमोल पाटील, नितीन झाल्टे, प्राचार्य. महेंद्र रघुवंशी, प्रा. पवित्रा पाटील, डॉ. संदीप पाटील (ऑनलाईन उपस्थित), कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखा अधिकारी सीए रवींद्र पाटील, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक प्रा. योगेश पाटील हे उपस्थित होते.

या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार, विद्यापीठाच्या 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत विद्यार्थ्यांना यापूर्वी प्रति विद्यार्थी प्रति तास ४० रुपये मानधन देण्यात येत होते. आता त्यामध्ये १२ रुपयांची वाढ करून हे मानधन प्रति तास ५२ रुपये करण्यात आले आहे. या वाढीमुळे आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत रोजगाराची संधी मिळून त्यांच्या शैक्षणिक प्रवासाला अधिक बळ मिळणार आहे.

याशिवाय, विद्यार्थी विकास विभागामार्फत वर्षभर आयोजित करण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा, व्यक्तिमत्त्व विकास व नेतृत्व विकास उपक्रमांसाठी पूर्वी प्रति विद्यार्थी प्रति दिवस २०० रुपये इतके अनुदान उपलब्ध करून दिले जात होते. विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग आणि कार्यक्रमांचे स्वरूप लक्षात घेऊन कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी यांच्या निर्देशानुसार या अनुदानात वाढ करून ते प्रति विद्यार्थी प्रति दिवस २२० रुपये करण्यात आले आहे. या वाढीमुळे अधिक दर्जेदार उपक्रमांचे आयोजन करणे शक्य होणार असून विद्यार्थ्यांना त्याचा थेट लाभ मिळणार आहे.

त्याचप्रमाणे, विद्यापीठाच्या नवोपक्रम व नवसंशोधन विभागामार्फत आयोजित करण्यात येणाऱ्या उद्योजकता कार्यशाळांसाठी देण्यात येत असलेल्या १५ हजार रुपयांच्या निधीत पाच हजार रुपयांची भरीव वाढ करून तो २० हजार रुपये करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता, स्टार्टअप संस्कृती, नवोपक्रम, संशोधनाधिष्ठित विचार आणि कौशल्य विकासाला अधिक प्रोत्साहन मिळणार आहे. विद्यार्थ्यांना उद्योग क्षेत्राशी जोडण्यासाठी आणि स्वावलंबी बनविण्यासाठी या कार्यशाळा अधिक प्रभावीपणे आयोजित करता येणार आहेत.

तसेच विद्यापीठाच्या संगणकशास्त्र प्रशाळेतविद्यार्थ्यांना कृत्रीम बुध्दीमत्ता प्रशिक्षणासाठी आर्टीफिशल इंटेलिजन्स  मशिन लर्निंग प्रयोगशाळा उभारणीसाठी ४४ लाख रूपयांचा अंदाजित खर्चास मंजूरी देण्यात आली. या प्रयोगशाळे अंतर्गत विद्यार्थ्यांना एआय प्रशिक्षणाचे काम केले जाणार आहे. त्यामुळे विद्यापीठाचा विद्यार्थी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून त्यास अद्ययावत नवीन संधी उपलब्ध होवू शकणार आहेत.

व्यवस्थापन परिषदेच्या या निर्णयामुळे विद्यापीठाच्या विद्यार्थी-केंद्रित धोरणाला आणखी बळ मिळाले असून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विद्यापीठ सातत्याने कटिबद्ध असल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे. आर्थिक सहाय्य, कौशल्य विकास, नेतृत्व क्षमता आणि उद्योजकता या सर्व बाबींना प्रोत्साहन देणारे हे निर्णय विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी महत्त्वाचे ठरणार असल्याची भावना व्यक्त करण्यात येत आहे.

---

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२६ दिनांक: २२ जुलै, २०२६

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

कृपया, उपरोक्त बातमीस आपल्या लोकप्रिय दैनिकातून प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

जनसंपर्क अधिकारी करीता